# समुपदेशन प्रक्रियेपुर्वी उमेदवारांना द्यावयाच्या सुचना

- उमेदवारांनी समुपदेशनासाठी येताना त्यांचे मूळ ओळखपत्र सोबत आणावे उदाहरणार्थ आधार कार्ड पॅन कार्ड मतदान कार्ड ड्रायव्हिंग लायसन इत्यादी ओळखपत्रशिवाय उमेदवारांना आदेश निर्गमित केले जाणार नाहीत.
- उमेदवारांना पात्रता यादीतील गुणवत्तेनुसार समुपदेशनास बोलवण्यात येईल, तसेच राज्य कार्यालयाकडुन प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार सातारा जिल्हयातील रिक्त ४९ जागांसाठी संवर्गनिहाय गुणवत्ता यादीतील फक्त ७५ उमेदवारांना (म्हणजेच रिक्त जागांच्या १.५ पट) बोलाविण्यात येणार आहेत. **गुणवत्ता यादीतील फक्त हिरवा व इतर रंगानी अधोरेखित असलेल्या उमेदवारांनीच समुपदेशनासाठी जिल्हा परिषद -सातारा वेळेत उपस्थित रहावयाचे आहे.**
- **समुपदेशानंतरही जर एखादया प्रवर्गाचा उमेदवार मिळाला नाही तर सर्वसाधारण गुणवत्ता यादीनुसार पुढील उमेदवारांना बोलविणेत येईल.**
- **सातारा जिल्हयासाठी एकुण ४९ पदे रिक्त आहेत. त्यानुसार फक्त ४९ उमेदवारांनाच प्रशिक्षणासाठी पाठविणेत येईल व उर्वरित सर्व उमेदवारांना प्रतिक्षा यादीत ग्राहय धरणेत येईल.**
- **गुणवत्ता यादीत ज्या उमेदवारांचे अंतिम वर्षाचे मार्क ०.० असे नमुद आहेत अशा उमेदवारांना यापूर्वी संबंधित परिमंडळाकडुन हरकती नोंदविणेबाबत कळविणेत आलेले होते. परंतु ज्यांनी हरकती नोंदविले नाहीत अशा उमेंदवारांचे तेच गुण ग्राहय धरुन गुणवत्ता यादी तयार करणेत आलेली आहे. व गुणवत्ता यादीमध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करणेत येणार नाही.**
- **जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर २ गुणवत्ता यादी प्रसिध्द करणेत आलेली आहे. १) सर्वसाधारण गुणवत्ता यादी २) संवर्गनिहाय गुणवत्ता यादी.**
- प्रशिक्षण केंद्रनिहाय जागांचे Display सभागृहात केले जाईल.
- उमेदवाराने प्रशिक्षण केंद्राची निवड केल्यानंतर त्यामध्ये कुठलाही बदल केला जाणार नाही.
- जिल्हा निहाय निवड करावयाच्या उमेदवारांची संख्या आरोग्यवर्धिनी उपकेंद्राच्या मंजूर संख्येनुसार निश्चित केलेली असल्याने अतिरिक्त उमेदवारांना इतर जिल्ह्यांमध्ये नेमणूक करण्यासाठी संधी देण्यात येईल. समुपदेशनाने शेवटी याबाबत माहिती देण्यात येईल.
- उमेदवारांनी समुपदेशनासाठी त्यांची सर्व मूळ कागदपत्रे सोबत आणावीत तसेच मूळ प्रमाणपत्रांच्या दोन साक्षांकित प्रती सोबत आणाव्यात.
- समुपदेशन प्रक्रियेदरम्यान कोणाही उमेदवाराने समिती सदस्यांवर राजकीय दबाव आणू नये तसे केल्यास त्यांना समुपदेशन प्रक्रियेमधून अपात्र करण्यात येईल.
- उमेदवाराने प्रवेश परीक्षेसाठी देण्यात आलेले एडमिट कार्डची (Admit Card) ची प्रत सोबत आणावी.
- प्रशिक्षण केंद्र जागावाटप आदेश प्राप्त झाल्यानंतर उमेदवारांनी दिनांक २१ मार्च २०२३ पर्यंत प्रशिक्षण केंद्राच्या ठिकाणी रुजू व्हावे.
- प्रशिक्षणा दरम्यान उमेदवारांनी ८० % हजेरी पूर्ण करणे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या नियमाप्रमाणे आवश्यक राहील. हजेरी पूर्ण न भरल्यास उमेदवार एक्झिट एक्झाम (Exit Exam) साठी अपात्र ठरविण्यात येईल. यासाठी फक्त बायोमेट्रिक हजेरीचा विचार केला जाईल.

- प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षण केंद्रामध्ये शिस्तभंग केल्यास उमेदवारावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.
- प्रशिक्षण केंद्रामध्ये बायोमेट्रिक हजेरीपटाचा वापर विद्या वेतन देण्यासाठी केला जाईल.
- उमेदवारांना दरमहा रुपये १०,०००/- दहा हजार प्रमाणे विद्यावेतन अनुज्ञ राहील.
- उमेदवारांनी प्रशिक्षणा दरम्यान त्यांच्या निवासाची व्यवस्था स्वतः करावी.
- प्रशिक्षणासाठी लागणारे Modules,Journals,Log book इत्यादी प्रशिक्षण केंद्रामार्फत पुरविण्यात येतील.
- <u>आयुर्वेदिक, युनानी व बी.एस.सी (नर्सिंग) उमेदवारांसाठी प्रशिक्षण सहा महिन्यांचे राहील.</u>
- प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक यांचे मार्फत आयोजित केली जाणारी (Exit Exam) एक्झिट एक्झाम उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. सदर एक्झिट एक्झाम (Exit Exam) उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवारांना एकूण दोन (०२) attempt लागू राहतील.
- एक्झिट एक्झाम (Exit Exam) उत्तीर्ण झाल्यानंतर उमेदवारांना त्यांनी ज्या जिल्ह्यासाठी प्रवेश परीक्षा दिली आहे,त्या जिल्ह्यामधील उपकेंद्र स्तरावरील आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये एक्झिट एक्झाम (Exit Exam) च्या गुणवत्तेच्या आधारे जिल्हास्तरीय समुपदेशनाने नियुक्ती आदेश दिले जातील.
- निवड झालेल्या उमेदवारांनी दिलेल्या जिल्ह्यात तीन (०३) वर्ष सेवा देणे बंधनकारक आहे.
- निवड झालेल्या सर्व उमेदवारांकडून जिल्हा आरोग्य अधिकारी करारनामा भरून घेतील सदर करारनामांमध्ये उमेदवाराकडून प्रशिक्षण अर्धवट सोडून गेल्यास तसेच प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर दिलेल्या जिल्ह्यांमध्ये तीन वर्षे सेवा न केल्यास वसुली बाबत हमीपत्र भरून घेण्यात येईल. तसेच निवड झालेल्या उमेदवारांचे प्रशिक्षण अर्धवट सोडून गेल्यास तसेच प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर दिलेल्या जिल्ह्यामध्ये तीन (०३) वर्ष सेवा न केल्यास करारनाम्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे रुपये एक लाख तीन हजार रुपये (रु.१,०३,०००/-) दंड भरणे अनिवार्य राहील.
- जे उमेदवार समुदाय आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत आहेत अशा उमेदवारांना समुपदेशन फेरीमधून अपात्र करण्यात येईल.
- जिल्हा निहाय रिक्त पदांच्या ५० टक्के प्रतीक्षा दिन उमेदवारांची यादी जिल्हास्तरावर प्रतीक्षा दिन म्हणून समुपदेशन दिनांक पासून एक वर्षापर्यंत ग्राह्य धरण्यात यावी तसेच सदरील प्रतीक्षा दिन उमेदवारांना प्रशिक्षणासाठी नियुक्ती दिली जाणार नाही व प्रतीक्षा दिन यादीतील उमेदवार कोणत्याही परिस्थितीत भविष्यात प्रशिक्षणाचा किंवा नोकरीचा दावा करू शकत नाही पुढील एक वर्षात ज्या जिल्ह्यात रिक्त जागा होतील त्या जिल्ह्यात प्रतीक्षा दिन असलेल्या उमेदवारांच्या समोर समुपदेशनाद्वारे गुणवत्तेप्रमाणे सामाजिक व सामांतर आरक्षणाप्रमाणे प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येईल.
- <u>गैरहजर उमेदवारांना दुसरी संधी देण्यात येणार नाही.</u>
- <u>उमेदवारांनी प्रत्यक्ष समुपदेशनादिवशी व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अन्यथा प्रक्रियेमधुन अपात्र करणेत येईल व समुपदेशनानंतर कोणतीही तक्रार /हरकत ग्राहय धरली जाणार नाही.</u>